**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय जीवनाला २५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त भाजपाचं येत्या १७ तारखेपासून महिनाभर सेवा संकल्प अभियान

- मुंबई उच्च न्यायालयाचे 50 वे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी यांचा शपथविधी

- नेपाळमधे पूरबळींची संख्या १ हजार ३६५

**आणि**

- पूर्व जेरुसलेममधला ब्रिटीश दूतावास बंद करण्याचे इस्त्राएलचे निर्देश

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय जीवनाला २५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त भाजप येत्या १७ तारखेपासून महिनाभर सेवा संकल्प अभियान राबवणार आहे, अशी माहिती भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**होल्ड - बाईट - नितीन नवीन**

'सेवा संकल्प अभियान'ची सुरुवात रक्तदान शिबिराच्या आयोजनाने होईल. येत्या ७ ऑक्टोबर रोजी मोदी यांच्या सार्वजनिक सेवेची २५ वर्षं पूर्ण होत आहेत. प्रधानमंत्र्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ७ ऑक्टोबर रोजी ग्रामीण आणि शहरी भागांना जोडणारी 'सेवा ज्योती कलश यात्रा' काढली जाईल, अशी माहिती नवीन यांनी दिली.

**<><><><><>**

न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आज मुंबई उच्च न्यायालयाचे 50 वे मुख्य न्यायाधीश म्हणून शपथ घेतील. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाच्या शिफारशीनंतर राष्ट्रपतींनी शनिवारी त्यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. या नियुक्तीपूर्वी न्यायमूर्ती त्रिपाठी अलाहाबाद उच्च न्यायालयात कार्यरत होते. न्यायमूर्ती त्रिपाठी यांनी लखनौ विद्यापीठातून कायद्याचं शिक्षण

घेतलं. १९९२ मध्ये त्यांनी वकील म्हणून नोंदणी केली आणि प्रामुख्याने दिवाणी कायद्याच्या क्षेत्रात वकिली केली. २०१३ मध्ये त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आणि २०१५ मध्ये ते कायमस्वरूपी न्यायाधीश बनले. दरम्यान न्यायमुर्ती पुश्पेंद्र सिंग भाटी यांनी  जम्मू - काश्मिर आणि लदाख उच्च न्यायालचे मुख्य न्यायमुर्ती म्हणून आज शपथ घेतली.

<><><><><>

ब्रिक्स देशांच्या केंद्रीय अर्थमंत्र्यांची आणि मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नरांची बैठक मुंबईत होत आहे.  ब्रिक्स देशांच्या   संमेलनाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक होत असून, गेल्या महिन्यात जयपूर इथं अशी बैठक झाली होती. वित्तीय परिप्रेक्ष्यात चिकाटी, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता उभारणे ही या संमेलनाची संकल्पना आहे.

<><><><><>

संसदीय कामकाज मंत्रालयातर्फे भरवण्यात येणाऱ्या युवा संसद स्पर्धेचा बक्षीस समारंभ उद्या नवी दिल्लीत संसद भवनात होणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्या हस्ते विजेत्यांना गौरवण्यात येईल. जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये गेल्या ३० वर्षांपासून या स्पर्धा भरवण्यात येतात. वर्ष २०२५-२०२६ साठीच्या या स्पर्धेत देशभरातल्या १०० जवाहर नवोदय विद्यालयांनी भाग घेतला होता.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज कोलंबो इथे श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुराकुमारा दिसानायके यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही नेत्यांनी भारत आणि श्रीलंकेच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा पुनरुच्चार केला. तसंच या सुरक्षितता, शांतात आणि समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी संयुक्तपणे काम करण्याच्या वचनबद्धताही अधोरेखित केल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी समाज माध्यमावर नमूद केलं.

<><><><><>

सत्य निकेतन इमारत कोसळल्याच्या घटनेनंतर राजधानी दिल्लीच्या विविध भागातल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिल्ली महानगरपालिकेला दिले आहेत. तसंच कारवाईदरम्यान महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष हजर रहावं असंही त्यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरातल्या बळींची संख्या १ हजार ३६५ इतकी झाली आहे. बचाव पथकं बेपत्ता झालेल्या ५ हजारांपेक्षा जास्त जणांचा शोध घेत आहेत. बेपत्ता झालेल्यांमध्ये ५८९ परदेशी नागरिकांचा समावेश आहे. ओळख पटवण्याची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर १०२ मृतदेह त्यांच्या कुंटुबीयांच्या स्वाधीन करण्यात आले आहेत. तसंच, ओळख न पटलेल्या १ हजारापेक्षा जास्त मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

नेपाळची राजधानी काठमांडू इथं कार्यरत असलेल्या भारतीय न्यायवैद्यक पथकानं आतापर्यंत १ हजार ४०० हून अधिक डीएनए नमुन्यांची तपासणी केली असून, ३७८ डीएनए प्रोफाइल्स तयार केली आहेेत, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने आज दिली.

दरम्यान, चिलीमे इथल्या बोगद्यामध्ये भारतीय तांत्रिक पथकाकडून पाणी आणि चिखल उपसण्याचे काम सातत्यानं सुरू आहे. बोगद्याचा तीव्र उतार आणि अरुंद रस्ता यामुळे कामात अडथळे येत असले, तरी पथक विविध नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करून मदतकार्य करत आहे. अडथळे दूर करण्यासाठी अवजड यंत्रसामग्री नेण्याकरता तात्पुरता रस्ता तयार करण्याचं काम अंतिम टप्प्यात आहे. पुढच्या २ ते ३ दिवसांत ते पूर्ण होईल, असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

बिहारमध्ये गेले काही दिवस निर्माण झालेली पूरस्थिती आता काही प्रमाणात नियंत्रणात आली आहे. गंगा, गंडक, कोसी, सोन, पुनपुन आणि इतर नद्यांच्या पाणीपातळीत घट होत असून, अन्य काही नद्या मात्र अजूनही धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. पूरबाधित भागात मदतकार्य सुरू आहे. पाटणा, सारण, वैशाली, बेगुसराय, खगरिया, समस्तीपूर, जहानाबाद आणि अरवल या जिल्ह्यांत पूरग्रस्त भागात मदतकार्य सुरू आहे. ४५६ सामुदायिक स्वयंपाकघरं चालवली जात आहेत. मदत छावण्यांमधून मुलांना दूध, महिलांना सॅनिटरी किट्स आणि वैद्यकीय सुविधा पुरवल्या जात आहेत. सोन नदीची पाणी पातळी कमी झाल्यामुळे पाटणा - गया मार्गावरची रेल्वे सेवा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**<><><><><>**

पूर्व जेरुसलेममधला ब्रिटीश दूतावास बंद करण्याचे निर्देश इस्त्राएलने दिले आहेत. इस्त्राएली वसाहतींमधे तयार झालेल्या मालावर युकेने बंदी घातल्याच्या निषेधात हे निर्देश दिल्याचं इस्त्राएलचे परराष्ट्र व्यवहार मंत्री गिडोन सार यांनी सांगितलं. पूर्व जेरुसलेममधल्या ब्रिटीश दूतावासात गाझा पट्टीतल्या पॅलेस्टिनींविषयीच्या मुद्द्यावर कामकाज होतं.

पूर्व जेरुसलेममधला ब्रिटीश दूतावास बंद करण्याचे निर्देश इस्त्राएलने दिले आहेत. इस्त्राएली वसाहतींमधे तयार झालेल्या मालावर युकेने बंदी घातल्याच्या निषेधात हे निर्देश दिल्याचं इस्त्राएलचे परराष्ट्रव्यवहार मंत्री गिडोन सार यांनी सांगितलं. पूर्व जेरुसलेममधल्या ब्रिटीश दूतावासात गाझा पट्टीतल्या पॅलेस्टिनींविषयीच्या मुद्द्यावर कामकाज होतं.

<><><><>

गाझामधे इस्त्राएल विरुद्ध पॅलेस्टीन संघर्षावर दोन राष्ट्रांची निर्मिती हाच तोडगा असल्याचं ठाम प्रतिपादन ब्रिटन, फ्रान्स आणि कॅनडानं केलं आहे. ब्रिटीश प्रधानमंत्री अँडी बर्नहॅम, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन, आणि कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांनी प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे, की पश्चिम आशियात शांतता, स्थैर्य आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनं दोन राष्ट्रांची निर्मिती हाच उपाय आहे. इस्त्राएलबरोबर अर्थपूर्ण भागीदारी करण्याची इच्छा असून सुरक्षित आणि तणावमुक्त इस्त्राएल आणि पॅलेस्टीनला आपला पाठिंबा राहील, असं या राष्ट्रप्रमुखांनी म्हटलं आहे.

<><><><>

इराणच्या रिवोल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने अमेरिकेच्या युद्धनौकेवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांचा हल्ला केल्यानंतर अमेरिकेने इराणच्या पाच तेलवाहू नौकांवर काल हल्ला केला. यात पाचही नौका उद्ध्वस्त झाल्या. अल जझीरा आणि सीबीएस वृत्त वाहिनीनं ही माहिती दिली. त्यानंतर रिवोल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने जॉर्डन इथल्या अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य केलं. या वाहिन्यांच्या वृत्तानुसार  अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी इराणला पुन्हा हल्ला न करण्याचा इशारा दिला आहे. अन्यथा इराणच्या तेलवाहू जहाजांना लक्ष्य केलं जाईल.

<><><><>

सौदी अरेबियाच्या सार्वभौम क्षेत्रात झालेल्या  हौथी हल्ल्यांचा भारतानं निषेध केला आहे.या हल्ल्याचं लक्ष्य नागरी वस्त्या आणि आर्थिक उलाढालीची केंद्र होती.

<><><><>

अमेरिकन  खुल्या टेनिस स्पर्धेत अमेरिकेच्या जेसिका पेगुलाने उपान्त्य फेरीत धडक मारली आहे. अमेरिकेच्याच एम्मा नवारोला तिनं ३-६,६-४,६-३ असं पराभूत केलं. उपान्त्य फेरीत तिचा सामना गतविजेत्या अरिना सबालेंकाबरोबर होईल.

पुरुष गटात अमेरिकेच्या फ्रांसेस टियाफोएने अलेक्स मायकल्सनला ५-७, ३-६, ७-५, ६-३, ७-६ असं हरवून उपान्त्य फेरी गाठली आहे.

//<><><><><>//